सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना लिमिटेड, अमृतनगर

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना लिमिटेड, अमृतनगर

पो. संगमनेर एस. के. (४२२६०८) तालुका – संगमनेर, जिल्हा – अहमदनगर
तार : संगमसाकर (संगमनेर), फॅक्स नंबर : ०२४२५-२२५४२५, फोन नंबर : २२५३७०,२२५३९९,२२५४५७,२२५४९९
E-mail : amrutsugar@yahoo.co.in, amrutsugar@rediffmail.com, Web Site : www.thoratsugar.com

जावक नंबर : सभाथोससाका /एम.बी./जनरल/१६४४/२०१९ दिनांक : ०७/०८/२०१९

# अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांसाठी)

महाशय,

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना लिमिटेड, अमृतनगर, तालुका – संगमनेर, जिल्हा – अहमदनगर या संस्थेची सन २०१८-२०१९ या वर्षाची 'अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा' **रविवार दिनांक २५/०८/२०१९ रोजी दुपारी १.०० वाजता** कारखाना कार्यस्थळावरील अमृतेश्वर मंदिराचे समोरील प्रांगणात कारखान्याचे विद्यमान चेअरमन **मा.ॲड. माधवराव सावळेराम कानवडे** यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयांचा विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केलेली आहे. तरी सदर सभेस वर निर्दिष्ट केलेल्या तारखेस व वेळेस आपण उपस्थित राहावे ही नम्र विनंती.

● सभेपुढे येणारे विषय ●

१) दिनांक २०/९/२०१८ रोजी झालेल्या सन २०१७-२०१८ या वर्षाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.

२) दिनांक ३१/३/२०१९ रोजी संपणाऱ्या सन २०१८-२०१९ या वर्षाचा संस्थेच्या कामकाजाचा मा.संचालक मंडळाने सादर केलेला वार्षिक अहवाल व दिनांक ३१/३/२०१९ अखेरचा ताळेबंद, नफा-तोटा पत्रके स्वीकारुन मंजूर करणे

३) मा. वैधानिक सनदी लेखापरिक्षक (नाशिक ) यांचेकडून सन २०१८-२०१९ या वर्षाचा दिनांक ३१ मार्च २०१९ अखेरच्या आलेल्या लेखापरिक्षण अहवालाची वाचून नोंद घेणे, तसेच सन २०१७-२०१८ या वर्षाचा दोषदुरुस्ती अहवाल स्वीकारणेबाबत.

४) सन २०१९-२020 सालाकरिता मा. संचालक मंडळाने सादर केलेले भांडवली व महसूली खर्चाचे अंदाजपत्रक स्वीकारणे तसेच सन २०१९-२020 सालाकरिता कर्ज व भांडवल उभारण्याचा मा. संचालक मंडळास अधिकार देणे.

५) सन २०१९-२020 या आर्थिक वर्षाच्या लेखा परिक्षणासाठी शासनमान्य नामतालिकेमधून वैधानिक लेखा परिक्षकाची नियुक्ती करणे व लेखा परिक्षण शुल्क ठरविणे.

६) साखर कारखान्याचे मशिनरी आधुनिकीकरण व विस्तारीकरण केल्यामुळे नॅशनल हेवी इंजिनिअरींग कंपनीच्या प्लॅन्टमधील अनावश्यक व निरुपयोगी मशिनरीची विक्री केली आहे त्यास मान्यता देणे तसेच विक्री न झालेल्या बकाऊल्फ कंपनीचे प्लॅन्टमधील जुनी अनावश्यक व निरुपयोगी मशिनरीचे फेर मुल्यांकन करुन ई-ऑक्शनद्वारे विक्री करणेस मंजुरी देणे बाबत.

७) मागील लागोपाठ पाच वर्षाच्या कालावधीत सर्व सदस्य मंडळाच्या किमान एका बैठकीला अनुपस्थित असणाऱ्या सदस्यांची अनुपस्थिती क्षमापित करणे बाबत निर्णय घेणे.

८) सन २०१८-२०१९ चे नफा वाटणीस मंजूरी देणे.

९) मा. अध्यक्ष महाशय यांच्या परवानगीने आयत्यावेळी योग्य रितीने येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

कळावे,

मा. संचालक मंडळाच्या आदेशान्वये,
**जगन्नाथ भाऊराव घुगरकर**
कार्यकारी संचालक
सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना लिमिटेड, अमृतनगर

विशेष सूचना :

१) सभासदास अहवाल व ताळेबंद वगैरे संबंधी माहिती पाहिजे असल्यास ती शनिवार व इतर सुट्टीच्या दिवसांखेरीज कार्यालयीन वेळेत मिळेल.

२) सभासद सहकारी सोसायट्यांनी (संस्था सभासद, जॉईट व कलेक्टीव्ह फार्मिंग सोसायटी सभासद) त्यांच्या वतीने सभेस हजर राहाणे, सभेत भाग घेणे, मतदान करणे इत्यादींबाबत संस्थेच्या ज्या सभासदास अधिकार दिलेले आहेत त्या सभासदाच्या नावाचा उल्लेख असलेल्या संस्थेच्या मा. चेअरमन अथवा व्हाईस चेअरमन आणि सेक्रेटरी यांच्या संयुक्त सही व शिक्यानिशी प्रमाणित केलेल्या पंचकमिटीच्या ठरावाची प्रत सभेपूर्वी कार्यालयीन वेळेत या कार्यालयात मिळेल अशा रितीने पाठवावी व त्या ठरावाची प्रत सभेस हजर राहताना बरोबर आणावी.

३) सभेसाठी प्रवेशपत्रिका सभास्थानाजवळील गेटच्या बाहेर मिळेल.

४) कारखान्याच्या कामकाजासंबंधी सभासदांच्या काही सूचना अगर प्रश्न असल्यास त्या सभेपूर्वी ५ दिवस अगोदर कारखान्याच्या कार्यालयीन वेळेत कार्यालयात पोहचतील अशा बेताने पाठवाव्यात अथवा समक्ष आणून द्याव्यात.